**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162


YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ७२ वा ● शुक्रवार २८ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| 77Volume 1| Issue 72 | Date : 28/07/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

## विधिमंडळाचे अधिवेशन ४ ऑगस्टपर्यंत चालणार

मुंबई : राज्यात सध्या पावसाचा हाहाकार असून, राज्यातील अनेक भागात याचा परिणाम पहायला मिळत आहे..मुंबईसह कोकणात पडणाऱ्या या मुसळधार पावसाचा फटका पावसाळी अधिवेशनाला देखील बसणार की काय अशी चर्चा रंगू लागली होती. मात्र अधिवेशन ठरलेल्या तारखेला संपणार यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे. पण अधिवेशन लवकर संपवा ही चर्चा अचानक सुरू झाली होती.राज्याचे पावसाळी अधिवेशन १७ जुलैपासून सुरू झाले असून, अधिवेशनाचा हा दुसरा आठवडा आहे. पहिल्याच दिवसांपासून शांततेत सुरू असलेले हे अधिवेशन लवकर गुंडाळले जाईल अशी चर्चा गुरुवारी सकाळपासूनच सुरू झाली होती. काही आमदारांनी तशी मागणीही केली होती. भाजप आमदार संजय कूटे यांनी तर आपण तशी विनंती सभागृहात करणार असल्याचे माध्यमांना सांगून टाकले. राज्यातील अनेक भागात सध्या पूरस्थिती आहे. ज्या भागात पूरस्थिती आहे त्या भागातले आमदार, पालकमंत्री अधिवेशनात व्यस्त आहेत. अधिवेशन



सुरू असल्याने अधिकारीही अधिवेशनात व्यस्त आहेत. अधिवेशनामुळे इतर यंत्रणावर ताण पडत असल्याने अधिवेशन संपवून ही यंत्रणा पूरस्थितीसाठी कामाला लावावी अशी आमदारांची मागणी होती.

दरम्यान एकिकडे अधिवेशन लवकर संपवण्याची मागणी होत असताना दुसरीकडे मात्र काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी मात्र सरकारवर टीका करत अधिवेशन न संपवण्याची मागणी केली होती. मुंबईसह राज्याच्या काही भागात अतिवृष्टी होत आहे पण राज्यातील अर्ध्या भागात अजून पुरेसा पाऊसही झालेला नाही. सरकारने पावसाचे कारण पुढे करुन अधिवेशन गुंडाळण्याचा प्रयत्न करु नये. जनतेच्या अनेक प्रश्नांवर सभागृहात चर्चा होणे गरजेचे आहे. सरकार चर्चेपासून पळ काढत असल्याचे दिसत आहे परंतु पावसाळी अधिवेशन ठरल्याप्रमाणे पूर्णवेळ झाले पाहिजे ही काँग्रेस पक्षाची भूमिका आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले. सकाळपासून सुरू असलेल्या चर्चेला कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीनंतर पूर्णविराम मिळाला. दुपारी । **पान २ वर**

## महाराष्ट्रातील ८५.६६ लाख शेतकऱ्यांना पीएम किसानच्या १४ व्या हप्त्याचा लाभ

मुंबई : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १४ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आलं आहे. काल (२७ जुलै) राजस्थानमध्ये झालेल्याा कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या हप्त्याचे वितरण करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील ८५.६६ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळत आहे. त्या लाभापोटी सुमारे एक हजार ८६६ कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना ही शेतकऱ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा करणारी ऐतिहासिक योजना असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचे सहा हजार आणि राज्य सरकारच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेचे सहा हजार असे वर्षाला एकूण १२ हजार रुपये शेतकऱ्याला मिळणार आहेत. शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी सन्मान योजना सुरु करणारे महाराष्ट्र हे देशातील



पहिले राज्य असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. या योजनेचा शेतकऱ्याला मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल. शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले पाहिजे यासाठी कृषी विभाग काम करत असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

**देशातील साडे आठ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात १४ व्या हप्त्याचे वितरण**

राजस्थानच्या सिकर जिल्ह्यातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील साडे आठ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या चौदाव्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. एकूण १८ हजार कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. तसेच देशातील सव्वा लाख 'पी एम किसान समृद्धी केंद्रांचे लोकार्पण केले. ही केंद्र शेतकऱ्यांच्या उन्नतीचा मार्ग प्रशस्त करतील, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

**केंद्राकडून दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची आर्थिक मदत** पीएम किसान योजनेचा एप्रिल ते । **पान २ वर**


## राज्यात आतापर्यंत सरासरीच्या १०४ टक्के पाऊस



मुंबई : सध्या राज्याच्या विविध भागात चांगला पाऊस (ठरळप) कोसळत आहे. काही भागात पावसामुळं जनजीवन विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. या पावसामुळं धरणांच्या पाणी साठ्यात चांगली वाढ होत आहे. राज्यात आतापर्यंत सरासरीच्या १०४ टक्के पाऊस झाला आहे. १७८ तालुक्यांत सरासरीच्या १०० टक्क्यांपेक्षा जास्त, १३० तालुक्यांत ७५ ते १०० टक्के आणि ५८ तालुक्यांत ५० ते ७५ टक्के पाऊस झाल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीनं देण्यात आली आहे. राज्यात १२० लाख ३७ हजार हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच सरासरीच्या ८५ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यवतमाळ, जळगाव, बीड, नांदेड, बुलढाणा इथं अधिक पेरणी झाली आहे. तर सांगली, ठाणे, पुणे, सोलापूर, गडचिरोली या भागात कमी पेरणी झाली आहे. राज्यात सर्वाधिक क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. १११ टक्के क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. तर कापसाची ९६ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. जास्तीच्या पावसामुळं पेरणी वाया गेली किंवा दुबार पेरणीची वेळ । **पान २ वर**

## ईडीचे संचालक संजय कुमार मिश्रा यांना पुन्हा मुदतवाढ

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : केंद्र सरकारच्या मागणीनंतर आता ईडीचे (एऊ) संचालक संजय कुमार मिश्रा यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. संजय मिश्रांना ईडीचे संचालक म्हणून १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. संजय मिश्रा हे फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सच्या पुनर्रचनेच्या प्रक्रियेत सहभागी असल्याने राष्ट्रीय हितासाठी त्यांना १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी मोदी सरकारने केली होती. त्यानंतर आता त्यांना १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र यापुढे संजय




कुमार मिश्रांना मुदतवाढ मिळणार नाही असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

संजय कुमार मिश्रांचा कार्यकाळ वाढवू नये असे आदेश २०२१ मध्येच संजय कुमार मिश्रा यांचा कार्यकाळ वाढवू नये असे आदेश २०२१ मध्येच सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानंतर नवी । **पान २ वर**

## काळे कपडे घालणाऱ्यांचे काळे भविष्य
### संसदेत भाजपचा विरोधकांवर हल्लाबोल


नवी दिल्ली : मणिपूरच्या मुद्दय़ावरून गुरुवारी, अधिवेशनाच्या सहाव्या दिवशीही संसदेतील कोंडी कायम राहिली. संसदेत 'इंडिया'च्या सदस्यांनी काळे कपडे घालून केंद्र सरकारचा निषेध केला. त्यावर, 'काळे कपडे घालणाऱ्यांचे भविष्य काळे असून देश त्यांना सहन करणार नाही', असा हल्लाबोल केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी राज्यसभेत केला. काळे कपडे घालणाऱ्या विरोधकांकडे देशाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर वाढलेले बळ समजून घेण्याची क्षमता नाही. त्यांचे मन काळे असून काळे धन लपवण्यासाठी त्यांनी काळे कपडे घातले असावेत.



विरोधकांचा भूतकाळ काळाच होता, त्यांचे वर्तमान आणि भविष्यही काळेच असेल, अशी टीका गोयल यांनी केली. भाजपप्रणीत केंद्र सरकार स्वत:पुरते बघत नाही. आम्ही विरोधकांच्या आयुष्यातील काळोखही दूर करू, त्यांनाही सूर्यकिरणे पाहाता येतील, त्यांच्यावरील डागही नाहीसे होतील. विकसित, समृद्ध भारतासाठी कमळ फुललेले दिसेल, अशा चारोळय़ा गोयल यांनी राज्यसभेत व नंतर लोकसभेत वाचून दाखवल्या!

काळय़ा कपडय़ांचे समर्थन करताना काँग्रेस खासदार गौरव गोगोई म्हणाले की, पंतप्रधानांच्या अहंकाराचा निषेध करण्यासाठी आम्ही काळे कपडे घातलेले आहेत. देश जळत असताना, मणिपूरमध्ये वांशिक हिंसा होत असताना पंतप्रधानांना फक्त स्वत:च्या प्रतिमेची काळजी आहे. गोगोई यांनी लोकसभेत केंद्र । **पान २ वर**

## सोलापूर विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार निवृत्त सरन्यायाधीश उदय लळीत यांना जाहीर



सोलापूर/प्रतिनिधीः पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा यंदाचा प्रतिष्ठेचा आणि मानाचा जीवनगौरव पुरस्कार सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश उदय उमेश लळीत यांना जाहीर झाल्याची घोषणा प्रभारी कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. या पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली आहे.

सोलापूर विद्यापीठाच्या जीवनगौरव पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. यात सोलापूर ही जन्मभूमी, कर्मभूमी आणि ऋणानुबंध असणाऱ्या महनीय व्यक्तीस जीवनगौरव हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन त्यांचा। **पान २ वर**

## राष्ट्रवादीचीही आता चिन्हाची लढाई सुरु होणार?
### शरद पवार गटाला निवडणूक आयोगाची नोटीस

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीनंतर निवडणूक आयोगात फारशी हालचाल होत नाही, अशी चर्चा असतानाच याबाबत अखेर निवडणूक आयोगाचं पहिलं पाऊल पडलं आहे. अजित पवार गटानं पक्षावर केलेल्या दाव्याबाबत शरद पवार गटाला निवडणूक आयोगानं नोटीस बजावली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आपणच आहोत हा दावा अजित पवारांनी केला आहे, त्याबाबत आपलं उत्तर द्या असं आयोगानं या नोटीशीत म्हटलं आहे. त्यासाठी ३ आठवड्यांची मुदत देण्यात आली आहे.



२ जुलै रोजी, राष्ट्रवादीच्या ९ मंत्र्यांनी शिंदे फडणवीस सरकारमध्ये सामील होत मंत्रिपदाची शपध घेतली. त्यानंतर ५ जुलै रोजी अजित पवार गटाकडून निवडणूक आयोगात कागदपत्रं सादर करण्यात आली होती. ३० जून रोजीच पक्षाच्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अजित पवारांची निवड झाल्याचा दावा यावेळी करण्यात आला होता. ४० आमदारांच्या सह्यांनी सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतल्याचाही दावा करण्यात आला होता. आता या सगळ्याबाबत शरद पवार गटाचं नेमकं आयोगासमोर म्हणणं काय आहे, हे त्यांना कळवावं लागणार आहे.

खरंतर, ज्या दिवशी अजित पवार गटानं निवडणूक आयोगात कागदपत्रं सादर करण्यात आली, । **पान २ वर**

## भीज पाऊस,अल्प पेरणी,खरीप हंगाम वाया जाण्याची भीती
### अक्कलकोट तालुक्यात शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची प्रतीक्षा

विश्वनाथ चव्हाण/अक्कलकोट :संपुर्ण जुन महिना वाया गेला,१५जुलैनंतर भीज पाऊस सुरू आहे.या भीज पावसाने जमिनित चांगली ओल निर्माण झाल्याने आल्प पेरणी झाली असुन उर्वरित खरीप पेरणीचा श्रीगणेशा होईल की,नाही.या चिंतातुर अवस्थेत शेतकरी हवालदिल झाला आहे.



वेळत मान्सून अगमन होणार असल्याच्या भाकितामुळे मे महिन्याच्या शेवट आठवड्यापर्यंत शेतकर्यांनी शेतीची पुर्ण मशागत केली होती.पैशाची जमवाजमव करून बि.बियाणे व खताची खरेदी करून ठेवली.जून महिना संपला,जुलैअखेर टप्पा गाठला तरी वरूण राजा कृपादृष्टी करायला तयार नाही.विहीर आणि बोअरच्या पाण्याची पातळी खोलावर जात आहेत.मोठा पाऊस नसल्याने ओढे,नाले अद्याप कोरडेच आहे.

अक्कलकोट तालुक्यात फक्त भीज पाऊस सुरू आहे.पावसाने दडी मारल्याने पेरणी खोळंबली आहेत. संपूर्ण जून महिण्यात पावसाने तोंड दाखविले नाही. निम्या जूलैनंतर भीज पावसाने हजेरी लावली.हा भीज पाऊस थांबल्यास खरीप पेरणी होऊ शकते.अशीच स्थिती राहिल्यास खरीप हंगाम वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

गेल्या पाच सहा दिवसांपासून वारा आणि ढगाळ वातावरण तयार झाल्याने या भागात अधूनमधून हलक्या सरी बरसत आहेत.जून,जुलै महिण्यात चांगला पावसाची अपेक्षा होती.परंतु पाऊस पडलाच नाही.येत्या काळात पावसाचा जोर वाढल्यास विहीर आणि बोअरच्या पाण्याची पातळी वाढेल.आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.अशी अपेक्षा आहे.

## रतन टाटांना महाराष्ट्राचा पहिला 'उद्योगरत्न पुरस्कार' जाहीर

मुंबई : नामांकित उद्योगपती आणि टाटा समूहाचे सर्वेसर्वा रतन टाटा यांना महाराष्ट्राचा पहिला उद्योगरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत ही माहिती दिली. महाराष्ट्र शासनाच्या वतीनं महाराष्ट्र भूषणच्या धर्तीवर या वर्षीपासून 'उद्योगरत्न पुरस्कार' देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार साहित्य, कला, क्रीडा आणि विज्ञान या क्षेत्रामधल्या अलौकिक कामगिरीसाठी प्रदान करण्यात येतो. त्याच धर्तीवर उद्योगक्षेत्रातील योगदानासाठी या वर्षीपासून 'उद्योगरत्न पुरस्कार' देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बुधवारी झालेल्या बैठकीत पहिला पुरस्कार टाटा उद्योग समूहाचे सर्वेसर्वा रतन टाटा यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.

रतन नवल टाटा हे टाटा समूहाचे विद्यमान अध्यक्ष आहेत. त्यांना उद्योग आणि व्यापार क्षेत्रात चांगल्या कामगिरीसाठी २००० मध्ये भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्याकडे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून मानद डॉक्टरेट आहे. नोव्हेंबर २००७ मध्ये फॉर्च्यून मासिकाने त्यांना व्यवसायातील २५ सर्वात



प्रभावशाली लोकांपैकी एक असल्याचं जाहीर केलं होतं. मे २००८ मध्ये टाटा यांचा समावेश टाइम मासिकाच्या २००८ च्या जगातील १०० प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत करण्यात आला होता. यावर्षीच्या एप्रिलमध्ये रतन टाटा यांना ऑस्ट्रेलियाच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मान, 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया'ने गौरवण्यात आलं होतं. तसेच त्यांना इतरही अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

### ❋ सुविचार ❋

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### शेवटी वेळ येतेच...

महाराष्ट्रातील भ्रष्टाचारी नेत्यांवर ईडीचा वापर करुन त्यांना तुरुंगात पाठविणारे, कथित भ्रष्टाचारावर तुटून पडणारे भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या अखेर अडकले. त्यांची बोलती बंद केली गेली, त्यांना शरमेने मान खाली घालावी लागली, त्यांची अश्लील चित्रफीत व्हायरल झालीच, शिवाय विधिमंडळाच्या अधिवेशनातही त्याचे तीव्र पडसाद उमटले. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी तब्बल आठ तासांच्या चित्रीकरणाची सिडीच सभापतींना देऊन खळबळ उडवून दिली. तर दुसरीकडे विधानसभेत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण देत ठोस पुरावे प्राप्त झाल्यास सखोल चौकशीची ग्वाही दिली. दानवेंच्या भाषणात तथ्य असेल तर सोमय्यांवर कठोरात कठोर कारवाई होणे गरजेचेच आहे. या सिडी प्रकरणावरुन राजकारणाचा दर्जा किती घसरला आहे हे स्पष्ट होते. नैतिकतेच्या गप्पा मारणारे जेव्हा अनैतिकतेच्या डोहात डुबकी मारतात, तेव्हा त्यांच्या अब्रूची लक्तरे उडणार हे विधिलिखितच आहे. मात्र, प्रस्तुत प्रकरणात सोमय्यांनी खरोखरच कुणा महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यासोबत अश्लील वर्तन केले की, सोमय्यांना अडकवण्यासाठी काही कुभांड रचले गेले, असे प्रश्न पडल्यावाचून राहत नाहीत. यापूर्वी अनेकांसोबत असे झाले आहे. माजी वनमंत्री संजय राठोड, ृकृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यापासून ते माजी आमदार विजय शिवतारे, सेना नेते रघुनाथ कुचिक यांच्यापर्यंत कित्येक जणांवर अनैतिक प्रेमसंबंधांचे आरोप झाले. गेल्या वर्षी भाजप नेते गणेश नाईक यांचे लैंगिक शोषणाचे प्रकरणही चर्चेत आले. सात वर्षांपूर्वी दिल्लीचे तत्कालीन महिला आणि बालविकासमंत्री संदीपकुमार यांची दोन महिलांसोबतची आक्षेपार्ह सिडी समोर आली होती. परिणामी, 'आप'ने त्यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. राजस्थानातील भाजप आमदार विजय बन्सल यांचे काही फोटोही व्हायरल झाले होते. यात ते एका महिलेसोबत अश्लील चाळे करताना दिसत होते. कर्नाटकातील तत्कालीन उत्पादन शुल्कमंत्री वाय. एच. मेती यांनाही सेक्स स्कँडलच्या एका सिडीमुळे मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. मदत मागण्यासाठी आलेल्या एका महिलेचा त्यांनी गैरफायदा घेतल्याचा आरोप त्यांच्यावर होता. सार्वजनिक जीवनातील साधनशुचिता आणि नीतिमत्तेचे म्हणाल, तर राजकारणात ती कधीचीच निर्वस्त्र झाली आहे. राजकारणातील 'विश्वामित्रां'ना यापुढे अधिक काळजी घ्यावी लागेल.

## मतदार पडताळणीसाठी अधिकारी घरोघरी

भारतीय लोकशाही बळकट करण्यात भारत निवडणूक आयोगाची भूमिका महत्त्वाची आहे. आयोगाने निवडणूक प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अनेक सुधारणा केल्या आहेत. निवडणूक पारदर्शकपणे घेण्यासोबत आता सर्वसमावेशक मतदार यादी तयार करण्यावर तसेच मतदारांच्या दृष्टीने निवडणुका सुविधाजनक होतील यावर भर देण्यात येत आहे. मतदार याद्यांचे शुद्धीकरण करण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने राज्यात २१ जुलैपासून घरोघरी अधिकारी हा उपक्रम सुरु करण्यात आला असून २१ ऑगस्ट २०२३ पर्यंत संपूर्ण महिनाभराच्या काळात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बीएलओ घरोघरी भेटी देऊन मतदारांच्या नावांची पडताळणी करणार आहेत. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि भारत निवडणूक आयोगाच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबवला जात आहे. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याविषयी थोडक्यात

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी या एक महिन्यादरम्यान घरोघरी भेट देऊन मतदारांचे वैयक्तिक तपशील, पत्ता आणि छायाचित्रांची पडताळणी करणार आहेत. या मोहिमेद्वारे मृत आणि स्थलांतरीत मतदार, दुबार नोंदणी असलेले मतदार, मतदारांचाही शोध घेणार आहेत. तसेच मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्ड जोडण्याची प्रक्रिया, यासोबतच नव मतदार, तृतीयपंथी आणि विमुक्त जाती भटक्या जमातीतील मतदार, देहव्यवसाय करणाऱ्या महिला मतदारांचा शोध घेऊन त्यांची आणि मतदार यादीत नाव नसलेल्यांची नोंदणी करण्यात येणार आहे.

घरोघरी अधिकारी या उपक्रमामुळे राज्यातल्या मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाचे आणि अद्ययावतीकरणाचे काम सुलभ होणार आहे. हा उपक्रम म्हणजे आपण आपल्या मताधिकारापासून वंचित राहू नये याची सुनिश्चिती करण्याची नागरिकांसाठी मोठी संधी आहे. त्यामुळे जेव्हा हे अधिकारी आपल्या घरी येतील तेव्हा नागरिकांनी आपले स्वतःचे, आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची नावे मतदार यादीत आहेत की नाहीत हे तपासून घ्यावे. वयाची १८ वर्ष पूर्ण केली आहेत पण अजूनही




मतदार नोंदणी केलेली नाही अशांची मतदार नोंदणी करून घ्यावी. मतदार यादीतील आपले वैयक्तिक तपशील, पत्ता यात काही दुरूस्त्या असतील तर त्यासाठीचे अर्ज भरून द्यावेत. लग्नानंतर नाव बदललेल्या स्त्री मतदारांनी आपली नावे बदलून घ्यावीत. स्थलांतरीत झालेल्यांनी नव्या पत्त्याची नोंद करून घ्यावी.मतदार नोंदणीसाठी अर्जासोबत रहिवास पुरावा म्हणून विद्युत देयक, पाणी पट्टी, आधार कार्ड, बँकेचे पासबुक, भारतीय पारपत्र, नोंदणीकृत विक्रीखत, नोंदणीकृत भाडेकरार यापैकी एका तर वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, राज्य शिक्षण मंडळाने दिलेले दहावी, बारावीचे प्रमाणपत्रे यापैकी एका पुराव्याची आवश्यकता आहे.

निवडणूक प्रक्रियेविषयी असणारी उदासीनता दूर करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यांनी सहकार्य करावे. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कर्तव्यभावनेने सुटीच्या दिवशी आपल्याकडे मतदार नोंदणीसाठी येत असताना त्यांना प्रतिसाद देऊन १०० टक्के मतदार नोंदणी करून अभियान यशस्वी करावे. लोकशाही प्रक्रियेत मतदारांची भूमिका महत्त्वाची आहे. सर्वसमावेशकता आणि मतदारांचा सहभाग असल्यास लोकशाही यशस्वी ठरते. देशाचे भवितव्य तरुणांच्या हातात असताना युवा मतदारांची नोंदणीची टक्केवारी खूपच कमी आहे. हे चित्र बदलण्याची गरज असून युवांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग घेणे आवश्यक आहे, असे आवाहन निवडणूक आयोगाच्यावतीने करण्यात आले आहे.

मतदारांनी निवडणूक आयोगाचे प आणि संकेतस्थळाचा वापर करून मतदार यादीतील नाव तपासून घ्यावे. २१ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या मतदार यादी विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाचा लाभ घेत नागरिकांनी या प्रक्रियेत सहभाग घ्यावा. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी हा निवडणूक प्रक्रियेचा कणा आहे त्यांच्या प्रयत्नांना गृहनिर्माण संस्थांच्या सदस्यांनी साथ द्यावी.मतदारांशी संबंधित सर्व प्रकारच्या अर्जासाठी https://voters.eci.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. मतदार नोंदणीकरिता नागरिकांना प्रोत्साहित करण्यासाठी गृहनिर्माण संस्थांमध्ये हे अभियान राबविण्यात येत आहे. मतदारांच्या सहकार्यामुळेच हा उपक्रम यशस्वी होईल. सर्व मतदारांनी त्यांच्या घरी येणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. विनासंकोच आवश्यक ती माहिती आणि दस्तऐवज द्यावेत व हा उपक्रम यशस्वी करावा.

**–गीतांजली अवचट, उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय,पुणे**

**व्यक्ती विषेश**

## वंचित बहुजनाच्या जीवन सागरातील राजहंस मारुती बनसोडे ...

केवळ नळदुर्ग सर्कल मध्येच नव्हे तर संपूर्ण उस्मानाबाद जिल्हयात अंधश्रद्धा निर्मुलनासाठी विशेषतः पोतराज परंपरेच जोखड झुगारून देण्यासाठी, व्यसनमुक्तीच्या विरोधात, वंचित बहुजनाच्या समाजसेवा कार्यासाठी अत्यंत निष्ठेने, समर्पित भावनेने कार्य करणारे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते म्हणजे सन्माननीय मारुती बनसोडे सर.... बहजन समाजाच्या सुख दुखः चा प्रत्यक्ष अनुभवातून, त्रासातून परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून सरांनी स्वकर्तुत्वाने स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. आजही फुले, शाहू, आंबेडकरांच्या मानवतावादी समाजसेवा कार्याचा वसा आणि वारसा समर्थ पणे जोपासण्याचे निरंतर कार्य करताना दिसतात.

बहुजन समाजाची सर्वांगीण प्रगती हाच माझा पैसा आणि संपत्ती मानून उपेक्षिता विषयी सरांची आस्था आणि आंतरिक तळमळ ही केवळ शाब्दिक नसून कृतीशील स्वरूपाची आहे. ज्ञानाने, मनाने आणि विचार कार्याने प्रगल्भ असणारे मारुती सरांचा जनसंपर्क प्रचंड आहे, तुळजापूर तालुक्यातील बोरगाव सारख्या छोट्याशा गावापासून सुरु झालेला ५५ वर्षाचा जीवन प्रवासात त्यांनी अनेक मान्यवरांशी नाते जोडले.

विशेषाधिकार संपन्न अशा ब्राम्हण कुटुंबातील जन्म असूनही कुष्ठरोग्यांसाठी उपचार, पुनर्वसन आणि सक्षमीकरणयासाठी समर्पित भावनेने आनंदवनाच्या माध्यमातून कार्य करणारे भारतातील जेष्ठ समाजसेवक बाबा आमटे, मराठी सिनेनाट्य विश्वातील दुर्मिळ कलाकार निळू फुले, दलित चळवळीचे जेष्ठ नेते ॲड. एकनाथ आव्हाड, महाराष्ट्रातील पुरोगामी विचारवंत प्रा. एन.डी. पाटील, बुद्धिवादी विज्ञानवादी, विवेकवादी समाजसुधारक, मा. नरेंद्र दाभोलकर, राष्ट्र सेवा दल हाच श्वास आणि ध्यास असलेले जेष्ठ समाजवादी नेते भाई पन्नालाल सुरांना, महाराष्ट्रातील दुर्बल असंघटीत वंचित कामगारांच्या न्याय हक्कासाठी मौलिक योगदान देणारे डॉ. बाबा आढाव ,मराठवाड्याचे साने गुरुजी मा, सि. ना. आलुरे गुरुजी अशा अनेक मान्यवरांच्या विचार कार्याशी सन्माननीय बनसोडे सरांनी वैचारिक नाते समृद्ध केले आहे.

परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, उस्मानाबाद जिल्हा नशा बंदी मंडळाचे जिल्हा संघटक, वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्रातील नामांकित अशा यशदा पुणे येथील नामवंत प्रशिक्षक, तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अशा प्रतिष्टीत पदावर असताना सरांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांची याकाळात सर्वाप्रती असणारी आपुलकी, कृतज्ञता शब्दातीत आहे. आजही सरांचा समाजसेवा कार्याचा दिनक्रम नित्य नित्यनियमाने चालू असून बचत गट, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन उपक्रम, आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त गावोगावी भरड धान्य जाणीव जागृती, महिला शेतकरी मेळावे असे विविध उपक्रम मोठ्या ताकदीने, यशस्वीपणे राबवीत आहेत. सरांचा आज ५५ वा जन्मदिनानिमीत्त त्यांना उत्तम दीर्घ आयुआरोग्य लाभो हीच परिवर्तनवादी विचारवंताच्या चरणी वंदना.... जन्मोत्सवाच्या मन:पूर्वक शुभेच्छा...

**प्रा. (डॉ.) दत्ता साखरे**
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

पान १ वरुन

### विधिमंडळाचे अधिवेशन

तीन वाजता कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली आणि या बैठकीत अधिवेशन ४ ऑगस्ट रोजी संपणार असल्याची माहिती समोर आली. सोमवार आणि मंगळवारी विधिमंडळ अधिवेशनाला सुट्टी जाहीर करण्यात आली. शनिवार आणि रविवारी विधिमंडळाचे कामकाज बंद असते. आता, सोमवार आणि मंगळवारदेखील सुट्टी देण्यात आली. राज्यातील पावसाची परिस्थिती बघता सर्व आमदारांना शनिवार ते मंगळवार आपल्या मतदारसंघात या निमित्ताने जात येणार आहे.

### महाराष्ट्रातील ८५.६६ लाख

जुलै २०२३ या कालावधीचा देय लाभ देशातील लाभार्थी शेतकऱ्यांना दिला गेला. राजस्थानमधील सीकर येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन समारंभाद्वारे झच् किसानचा १४ वा हप्ता वितरीत केला. पीएम् किसान सन्मान निधी योजने अंतर्गत भारत सरकार दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपयांची आर्थिक मदत करते. हे सहा हजार रुपये प्रत्येकी चार महिन्याला दोन हजार रुपयांच्या हप्त्याने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात. आत्तापर्यंत १३ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले होते. अखेर पुढचा १४ हप्ता देखील शेतकऱ्यांना वितरीत करण्यत आला आहे.

### ईडीचे संचालक संजय कुमार ..

तरतूद करुन त्यांना मुदतवाढ देण्यात आली होती. त्यांच्या मुदतवाढीला न्यायालयाने आक्षेप घेतला होता. संजय मिश्रा यांचा ईडीचे संचालक म्हणून कार्यकाळ ३१ जुलैपर्यंत होता त्या दरम्यान केंद्र सरकारने नवीन संचालकांची निवड करावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. आता त्यांचा कार्यकाळ संपण्यासाठी एक आठवडा बाकी असताना केंद्र सरकारने पुन्हा एकदा संजय मिश्रांना मुदतवाढ दिली जावी अशी मागणी करत तो अर्ज सर्वोच्च न्यायालयात दिला होता.

मिश्रा यांना १९ नोव्हेंबर २०१८ मध्ये दोन वर्षांसाठी ईडीचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. नोव्हेंबर २०२० मध्ये मिश्रा पदमुक्त होणार होते. त्याआधीच मे महिन्यात त्यांनी वयाची ६० वर्ष पूर्ण केली. याचा अर्थ त्यांनी निवृत्तीचे वय गाठले. नोव्हेंबर २०२० मध्ये त्यांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधी त्यांचा कार्यकाळ दोनऐवजी तीन वर्षांचा करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारने नोव्हेंबर २०२१ मध्ये केंद्रीय दक्षता आयोग (उतउ) अधिनियम अंतर्गत एक सुधारणा अध्यादेश जारी केला. त्यानुसार, संजय मिश्रा यांचा कार्यकाळ १८ नोव्हेंबर २०२३ रोजी संपणार होता. आता, त्याआधीच सुप्रीम कोर्टाने ही सुधारणा रद्द केली.

### काळे कपडे घालणाऱ्यांच

सरकारविरोधात अविश्वास ठराव मांडला आहे. मात्र, त्यावरील चर्चेची तारीख व वेळ लोकसभाध्यक्षांनी निश्चित केलेली नाही. केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी राज्यसभेत परराष्ट्र धोरणावर विस्तृत निवेदन दिले पण, विरोधक आणि सत्ताधाऱ्यांच्या 'इंडिया–इंडिया' व 'मोदी–मोदी'च्या घोषणांनी सभागृह दणाणून टाकले. या गदारोळात वरिष्ठ सभागृह तहकूब करावे लागले. लोकसभेतही गोंधळ सुरू राहिल्याने सभागृह दोन वेळा तहकूब झाले. 'विरोधक स्वत:ला इंडिया म्हणवून घेतात पण, इंडियाबद्दलची माहितीही त्यांनी ऐकून घेतली नाही', असा संताप जयशंकर यांनी सभागृहाबाहेर व्यक्त केला. दुपारच्या सत्रात मणिपूरच्या मुद्दय़ावरून राज्यसभेत विरोधकांनी सभात्याग केला.

भाजपने संसदेत शालीनता व शिष्टाचाराच्या सर्व मर्यादा ओलांडल्या असून राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या भाषणात व्यत्यय आणण्यासाठी पीयूष गोयल यांनी भाजप सदस्यांना चिथावणी दिल्याचा आरोप काँग्रेसचे खासदार जयराम रमेश यांनी केला. दरम्यान, 'आप'चे निलंबित खासदार संजय सिंह यांचे संसदेच्या आवारातील ठिय्या आंदोलन गुरुवारीही सुरू होते. काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्यानंतर समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही सिंह यांची संसदेमध्ये जाऊन भेट घेतली.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली. 'भाजप आणि संघ देशाचे विभाजन करत आहेत, त्यांना केवळ सत्तेमध्ये रस असून ते त्यासाठी काहीही करतील, ते मणिपूरला आग लावतील, संपूर्ण देशाला आग लावतील. त्यांना देशाचे दु:ख आणि वेदना याबद्दल काहीही फिकीर नाही', असा आरोप राहुल यांनी केला.

### राज्यात आतापर्यंत सरासरीच्या..

आल्यास महाबीजने संपूर्ण नियोजन केल्याची माहिती कृषी विभागानं राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अध्यक्षस्थानी होते.

दरम्यान, प्रधानमंत्री पीक विमा योजनेत यावेळी शेतकऱ्यांचा सहभाग वाढला आहे. १२०.६८ लाख शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी झाले आहेत. मागील वर्षी खरीप हंगामात ९६.६२ लाख शेतकरी सहभागी झाले होते.

चालू खरीप हंगामामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे. इच्छूक शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२३ पर्यंत प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या लाभासाठी अर्ज करावेत, असे आवाहन कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांनी केलं आहे. या योजनेमध्ये कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होता येणार असल्याचे चव्हाण म्हणाले.राज्यात नैसर्गिक, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या योजनेला सन २०२७–२८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेची व्याप्ती दुसऱ्या टप्प्यात राज्यभर वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेसाठी राज्य आणि केंद्र पुरस्कृत योजनेत १९२० कोटी ९९ लाख इतक्या आर्थिक तरतुदीस मान्यता देण्यात आली असल्याची माहितीही कृषी आयुक्त सुनील चव्हाण यांनी दिली आहे.

### सोलापूर विद्यापीठाचा जीवनगौरव ..

सन्मान केला जातो. यंदाच्या या जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी उदय लळीत हे ठरले आहेत. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडून जीवनगौरव पुरस्कार स्वीकारण्यासाठी लळीत यांना विनंती केली होती, त्यांनी सदरील विनंती स्वीकारली आहे. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

१ ऑगस्ट २०२३ रोजी विद्यापीठाचा १९ वा वर्धापन दिन समारंभ साजरा होणार आहे. सकाळी आठ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी नऊ वाजता सोलापूर शहरातील हुतात्मा स्मृती मंदिर सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या समारंभास मुंबई विद्यापीठ, मुंबईचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### राष्ट्रवादीचीही आता चिन्हाची

त्याच्या आधीच ३ जुलै रोजी शरद पवार गटानं निवडणूक आयोगात कॅव्हिएटही दाखल केलं होतं. पण त्यानंतर गेले काही दिवस कुठलीही पुढची नोटीस निवडणूक आयोगाकडून येत नव्हती. एखाद्या पक्षावर दोन गटांनी दावा केल्यानंतर तातडीनं निवडणूक आयोगानं त्याबाबत नोटीस बजावून उत्तर मागवणं अपेक्षित असतं. पण, आता २० दिवसांनी ही नोटीस शरद पवार गटाला पाठवली गेली आहे. शरद पवार गटाकडून अभिषेक मनु सिंघवी, कपिल सिब्बल, देवदत्त कामत हे कायदेशीर बाजू सांभाळणार असल्याची माहिती सध्या समोर येत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगात आता शिवसेनेपाठापोठ राष्ट्रवादीच्या चिन्हासाठीची लढाई लवकरच सुरु होण्याची चिन्हं दिसत असल्याचं म्हटलं जात आहे. दरम्यान, शिवसेनेच्या चिन्हाबाबत निवडणूक आयोगानं शिंदेंच्या बाजूनं निर्णय दिला होता. त्यामुळे आता अजित पवारांच्या बाबतीत निवडणूक आयोग कोणता निर्णय घेतं, हे पाहणं देखील महत्त्वाचं असणार आहे. पण, आता शरद पवारांकडून या नोटीशीला काय उत्तर येणार, याची देखील उत्सुकता सर्वांना लागून राहिली आहे. राज्याच्या राजकारणात सुरु असलेल्या या राजकीय घडामोडींना आता कोणतं नवं वळण मिळणार, हे देखील पाहणं गरजेचं आहे. त्यामुळे शरद पवारांच्या उत्तराकडे आता संपूर्ण राजकीय वर्तुळाचं लक्ष लागून राहिल्याचं म्हटलं जात आहे.

## मुसळधार पावसाने तेलंगणाला झोडपले




हैदराबाद : तेलंगणामध्ये मुसळधार पाऊस सुरूच असल्यामुळे प्रशासनाला दक्षतेचा इशारा देण्यात आल्याची माहिती राज्याचे मुख्य सचिव ए शांती कुमारी यांनी गुरुवारी सांगितले. मुसळधार पावसामुळे राज्यातील नद्या आणि ओढे दुथडी भरून वाहत आहेत. तसेच सखल भागात पूर आला असून अनेक ठिकाणी रस्त्यांचे नुकसान झाले आहे. भद्रचलम येथे गोदावरी नदीची पातळी ४९.८० फूट इतकी वाढली असून पुराचा दुसरा इशारा देण्यात आला आहे. सखल भागातील लोकांना मदत छावण्यांमध्ये हलवण्याची उपाययोजना केली जात आहे.तसेच मुसळधार पावसामुळे राज्यातील शाळांना शुक्रवापर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. स्थानिक आणि जिल्हा प्रशासन पूरस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून असल्याचे मुख्य सचिवांनी सांगितले. त्याशिवाय राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ), राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) आणि अग्निशमन सेवा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच सचिवालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ड्रायपोर्ट प्रकल्पाची जमीन मोजणी कामगारांनी पाडली बंद



निफाड/प्रतिनिधीः भाऊसाहेब नगर-येथील निफाड सहकारी साखर कारखान्याच्या १०८ एकर जागेवरील प्रस्तावित ड्रायपोर्ट (मल्टी मॉडल लॉजिस्टिक हब) साठी सुरू झालेले जमीन मोजण्याचे काम कामगारांच्या विरोधामुळे बंद पडले आहे .या बहुप्रतिक्षित प्रकल्पाची प्रक्रिया अंतीम टप्प्यात असून सरफेशी कायदा २००२ अंतर्गत नाशिक जिल्हा मध्यवती बँकेच्या ताब्यात असलेली निफाड कारखान्याची १०८ एकर जमीन जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ला १०५ कोटींना हस्तांतरित हस्तांतरित करण्यात येणार असून त्यासाठी जमीन मोजणीच्या प्रक्रियेला आज सुरुवात करण्यात आली होती. जेएनपीटी, भुमापन विभाग, महसूल विभागाचे कर्मचारी यासाठी उपस्थित होते.निसाका कामगारांची थकीत वेतन, ग्रॅच्युईटी, ठेवी इत्यादी मिळून ८१.४९ कोटी इतकी थकीत बाकी कारखान्याकडे दहा वर्षापासून थकीत आहे. परतु याबाबत वारंवार कैफीयत मांडून सुद्धा नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने कामगारांचा उद्रेक होऊन त्यांनी जमीन मोजणी प्रक्रियेला विरोध करत ती बद पाडली. यावेळी झालेल्या कामगारांच्या द्वार सभेत कामगार संघटनेचे पदाधिकारी व कामगारांनी आपली भूशमका मांडली. यावेळी संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष सोमनाथ गडाख व सरचिटणीस बी. जी. पाटील यांनी भूमीका मांडताना स्पष्ट केले की कामगारांचा ड्रा यपोर्ट प्रकल्पाला कोणताही वि रोध नसून सर्वच कामगार प्रकल्प उभा राहावा यासाठी आग्रही आहेत.

जमीन विक्रीतून प्राप्त होणाऱ्या १०५ कोटी रकमेपैकी ३२ कोटी विक्रीकर वगळता उर्वरित ७३ ते ७५ कोटी रकमेपैकी किमान ५० टक्के रक्कम जिल्हा बँकेने कामगारांची थकीत देणे अदा करण्यासाठी द्यावी अशी आग्रही मागणी केली.थकीत देणे अदा करण्यासाठी जिल्हा बँकेचे अवसायक, प्रशासक व प्रशासनासमोर वारांवार मागणी करून देखील याबाबत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.३० ते ३२ वर्ष नोकरी करून सेवानिवृत्तीनंतर कामगार एक रुपयाही न प्राप्त होता देशोधडीला लागले आहेत.थकीत देण्याबाबत कामगारांच्या संपप्त भावना असून याबाबत ठोस निर्णय झाल्याशिवाय कामगारांचा जमीन हस्तांतरण प्रक्रियेस ठाम विरोध आहे. देशोधडीला लागलेले कामगार आपल्या न्याय्य मागणीसाठी लोकशाही मार्गाने झगडत असून याबाबत जिल्हा बँक व संबंधित यंत्रणेने दडपशाहीचा वापर केल्यास कामगारांच्या उद्रेकास व निर्माण होणाऱ्या परिस्थितीस संबंधित जबाबदार असतील. जिल्हा बँक, विक्रीकर विभाग व शासनाची अन्य यंत्रणा कारखान्याकडील आपली थकबाकी वसूल करण्यासाठी कायदेशीर मार्ग अवलंबतात, तर मग अकराशे जिवंत कामगारांनी कोणता गुन्हा केला? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. कामगार संघटनेनेचे माजी कार्यकारी अध्यक्ष विजय रसाळ, दिलीप निकम, बाळासाहेब बागस्कर यांनी कामगारांच्या समस्या मांडल्या. द्वारसभेनांतर कामगारांनी जिल्हा बँकेच्या भाऊसाहेबनगर शाखेवर धडक मारत धरणे आंदोलन केले.

यावेळी बँकेचे विभागीय अधिकारी श्री वाटपाडे यांनी संघटनेच्या प्रतिनिधीसमवेत चर्चा केली. थकीत देणीबाबत निर्णय झाल्याशिवाय जमीन हस्तांतरणाच्या पुढील प्रक्रियेस कामगारांचा प्राणांतिक विरोध राहील असा ठाम निर्धार सर्व कामगारांनी यावेळी व्यक्त केला.आांदोलनात संघटनेचे पदाधिकारी नवनाथ गायकवाड, सुभाष झोमन, उत्तम गायकवाड,नामदेव बोरस्ते,विष्णू संगमनेरे,संतोष रायते आदिंसह शेकडो कामगार व महिला सहभागी होत्या.

# चर्मकार बांधवांसाठी विविध योजना लाभ घ्यावा

कळंब/प्रतिनिधी : उस्मानाबाद, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाकडून अनुसूचित जातीतील चांभार,ढोर, होलार, मोची, आधीचा चर्मकार बांधवात समावेश होतो. आर्थिक शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी विविध कर्ज योजना राबविल्या जातात.

महामंडळामार्फत २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता राज्य व केंद्र शासनाच्या (एन एस एफ डी सी) योजना राबविण्यात येत आहे. ४८०० लाभार्थ्यांना कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. नवी दिल्ली येथील एन.एस.एफ.डी.सी यांच्या मुदती कर्ज योजनेअंतर्गत लघु उद्योगासाठी १ लाख ५० हजार रुपये आणि चर्मोद्योग यासाठी २ लाख रुपये,लघुरून वित्त योजना व महिला समृद्धी योजना यासाठी प्रत्येकी ५० हजार रुपये या योजनेसाठी मागील प्रलंबित नसती करिता २२ कोटी २१ लाख रुपये इतका निधी प्राप्त झाला आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात एन.एस.एफ.डी.सी यांच्या मुदती कर्ज योजनेअंतर्गत लघुउद्योग ५ लाख रुपये, लघुरून वित्त योजना या महिला समृद्धी योजना प्रत्येकी १ लाख ४० हजार रुपये, तसेच नवीन महिला अधिकारीता योजना ५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. एन. एस.एफ.डी.सी यांच्या शैक्षणिक कर्ज योजनेमध्ये वाढ झाली आहे. देशात २० लाख रुपये विदेशामध्ये ३० लाख का पर्यंत कर्ज मंजूर करण्यात येईल. अधिक माहितीसाठी नजीकच्या महामंडळाच्या जिल्हा कार्यालयास भेट द्यावी आणि सर्व चर्मकारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांनी केले आहे.

# भटक्या विमुक्त जाती जमातींना गृहचौकशी करून जातीचे दाखले द्यावेत : महेश शिंदे




अकलूज / प्रतिनिधी : राज्यातील भटक्या विमुक्त जाती जमातींना जातीचा दाखला मिळवण्यासाठी शासकीय नियमानुसार १९६१ पूर्वीचा पुरावा सादर करावा लागतो. परंतु या भटक्या विमुक्त जाती जमातींना पूर्वापार पासून आपली व कुटुंबाची उपजीविका भागवण्यासाठी आजवर गावोगावी वस्ती करून फिरस्ती जीवन जगावे लागत होते. त्यामुळे या समाज घटकातील बहुसंख्य कुटुंब बेघर व अशिक्षित स्थितीत आहेत. या कारणास्तव त्यांना जातीचे दाखले काढताना १९६१ पूर्वीचा पुरावा सादर करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. म्हणूनच या समाजातील नव्या पिढीतील अनेक मुलांना, विद्यार्थ्यांना व होतकरूंना शिक्षणा सारख्या मूलभूत अधिकारापासून वंचित राहावे लागत आहे. अनेक शैक्षणिक व शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. त्यामुळेच कौशल्य व गुणवत्ता असून देखील उच्च शिक्षण घेता न आल्याने हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर फेकला जात आहे.

आणि समजा एखाद्याने परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण घेतलेच तरी नंतर जातीच्या दाखल्यावाचून शासकीय नोकरी व शासकीय योजनांच्या लाभा पासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे या भटक्या विमुक्त समाजात बेरोजगार व सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. हे भटके विमुक्त समाजाचे नुकसान तर आहेच परंतु देशाचे सुद्धा नुकसान आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात शासन अनेक महत्वपूर्ण निर्णय घेत असून देखील भटके विमुक्तांच्या बाबतीत मात्र भेदभाव करत असल्याची भावना या समाजातील तरुणांच्या मनात असल्याचे चित्र आहे. या कारणास्तव माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ माळशिरस तालुका कार्याध्यक्ष महेश शिंदे तथा मैत्री प्रतिष्ठान सामाजिक संघटना संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलूज यांना या बाबतीत निवेदन देण्यात आले आहे. त्याचबरोबर येणाऱ्या स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी लोकशाही पद्धतीने प्रांत कार्यालय अकलूज समोर आजादी दो आंदोलन करणार असल्याचा महेश शिंदे यांच्या वतीने सरकारला इशारा देण्यात आला आहे.यावेळी मैत्री प्रतिष्ठान माळशिरस तालुका उपाध्यक्ष शंकर मस्के तसेच इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजी सैनिकांचा कुर्डूवाडीत सन्मान

कुर्डूवाडी/प्रतिनिधीः कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून तहसीलदार विनोद रणवरे, प्रशांत पाटील व नायब तहसीलदार विजय लोकरे यांनी तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान केला. यावेळी तालुक्यातील सर्व माजी सैनिक उपस्थित होते. माजी सैनिकांना कोणतीही अडचण असेल तर त्यांनी संपर्क साधावा, ताबडतोब अडचणीचा निपटारा करण्याचे आश्वासन तहसीलदार रणवरे यांनी दिले. याप्रसंगी माढा तालुका माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष अजिनाथ बोबडे, अरूण जगताप, नारायण उपासे, वसंतराव पाटील, ज्ञानदेव चोपडे, विश्वास जाधव, तानाजी कांबळे, जोतीराम भोसले, भारत पाटील, सुभाष बंड, गोरख बोराटे आदी उपस्थित होते.

# एकलव्य मॉडेल निवासी विद्यालय आणि जोधपुर मध्ये केंद्रीय विद्यालय उद्‌घाटन कार्यक्रम




पत्रकार नामदेव निर्मळे

नांदणी तालुका शिरोळ येथे आज दि.२७ जुलै २०२३ रोजी भारत वर्षाचे लाडके पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदीजी यांचे आज राजस्थान जिल्हा सीकर मध्ये १४ वा पी. एम. किसान योजना याचे लोकार्पण करून १७,५०० कोटी रु शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा केले. राजस्थान मध्ये २५० कोटी पेक्षा अधिक रूपये खर्च करून एकलव्य मॉडेल निवांसी विद्यालय आणि जोधपूर मध्ये एक केंद्रीय विद्यालय उदघाटन केले. हा कार्यक्रम लाईव्ह नांदणी भाजीपाला संघ नांदणी येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास नांदणी मधील शेतकरी वर्ग उपस्थित होता. हा कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती भा.ज. पाहिजे. जैन प्रकोष्ट तालुका अध्यक्ष उमेश संभूशेटे, सुनील पाटील (मेजर ) भाजपा तालुका उपाध्यक्ष.टाकवडे, सुनील शिंदे. भाजपा वाहतूक संघटना शिरोळ तालुका अध्यक्ष आणि नांदणी मधील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन अनिल येशे कृषिविज्ञ्वेता (कोरामंडल इंटरनॅशन ली.) भास्कर गोटे (कोरामंडल इंटरनॅशनल ली.) यांनी केले.

# पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात पालक मेळावा



निफाड/ प्रतिनिधी : पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात पालक मेळावा घेण्यात आला.असुन बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक देशमुख एस.बी.यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मेळाव्यात विद्यालयाची गुणवत्ता व विद्यालयात राबविले जाणारे शैक्षणिक उपक्रम यांची माहिती देण्यात आली. . शाळेत सुरू असणाऱ्या विविध उपक्रमांचे पालकांनी कौतुक केले.

या पालक शिक्षक मेळाव्यासाठी उपस्थित सिन्नरचे रंगकर्मी संजय गंगावणे यांनी या निमित्ताने समर्थ सावली आधार आश्रमातील अनाथ मुले हर्षल चंद्रशेखर नरड व निशाद चंद्रशेखर नरड यांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले पालकांनी मेळाव्यासाठी बहुसंख्येने उपस्थित राहून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घ्यावा त्यांना येणाऱ्या समस्या सोडवाव्या शिक्षण ही खरी काळाची गरज हे ओळखून आपल्या अर्धांगीनीला सुद्धा सहभागी करा असे सांगितले. समर्थ सावली अनाथ आश्रमाचे संस्थापक जयराम शिंदे यांनी आपण आमच्या अनाथ मुलांचा स्वीकार करून त्यांच्या शैक्षणिक गरजा व त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आपल्या विद्यालयाने केलेले उपक्रम अतिशय स्तुत्य असल्याचे सांगितले.

शालेय समितीचे चेअरमन चंद्रभान रेवगडे यांनी शालेय भौतिक गरजा पूर्ण करून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एस.टी .महामंडळाच्या बसची उपलब्धता करून त्यांना एस.टी. थांबा देण्याचे आश्वासन दिले.

शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रल्हाद रेवगडे यांनी मुलांनी शिस्तीचे पालन व वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे विविध सहशालेय उपक्रमात सहभागी होऊन आपला सर्वांगीण विकास घडवून आणावा.असे सांगितले.शालेय समितीचे सदस्य धनंजय रेवगडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.


यावेळी कुंडलिक रेवगडे,दत्तू रेवगडे,गणेश पाटोळे,दिलीप पाटोळे, बाळासाहेब पाटोळे, नारायण जाधव,नंदू शिंदे,चंद्रभान शिंदे,योगिता पाटोळे, पल्लवी रेवगडे, शोभा शिंदे तसेच या पालक मेळाव्यास पाडळी व आशापुरचे ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयातील उपशिक्षक टी.के.रेवगडे, बी.आर. चव्हाण, आर.व्ही. निकम, एस. एम.कोटकर, आर.टी.गिरी,एम. सी.शिंगोटे, एम.एम.शेख, सौ. सविता देशमुख,सी.बी.शिंदे,के.डी. गांगुर्डे,एस. डी.पाटोळे, आर. एस. ढोली, ए.बी.थोरे उपस्थिती होते.

# मारुती बनसोडे यांचा वाढदिवस संपन्न



नळदुर्ग/प्रतिनिधी : परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांचा आज वाढदिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला तुळजापूर पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश चव्हाण, तुळजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ड. रामचन्द्र ढवळे यांनी सत्कार करुन शुभेच्छा दिल्या परिवर्तनवादी चळवळीत मारुती बनसोडे यांचे कार्य मोलाचे आहे असे प्रतिपादन प्रकाश चव्हाण यांनी केले तर ग्रामीण भागातील वंचित घटकाला न्याय देण्यासाठी सातत्याने धडपड करणारा कार्यकर्ता म्हणून मारुती बनसोडे यांना संपूर्ण जिल्हा व महाराष्ट्र ओळखतो असे ड.रामचंद्र ढवळे म्हणाले आज नळदुर्ग परिसरातील सर्व कार्यकर्ते यांनी मारुती बनसोडे यांना वाढ दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत दयानंद जाधव, सिताराम जाधव यांनी त्यांचा सत्कार केला त्याच बरोबर सकाळी आंबेडकरी चळवळीतील सर्व कार्यकर्ते यांनी ही त्यांचा सत्कार केला त्यात अरुण लोखंडे, एस के गायकवाड, अरविंद लोखंडे, किशोर धुमाळ, सह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## शब्दकोडे क्र ७२



आडवे शब्द १.सुलभ मिळालेले,कष्ट न घेता ३.गुजरातमधील एक प्रसिद्ध शहर ५.गोलमाल चित्रपटाचा नायक ९.किंमत,भाव १०.कारण,निमीत्त १२.सूर्य,दही घुसळण्याचे साधन १३.२६जानेवारी १६.जहाजात वापरण्यात येणारे एक दिशा दाखण्याचे यंत्र १९.धाक,जरब २१.हिसका,दचका २३.रात्री घातलेली पाळत २४.आंब्याचा रस २६.रमरम उलटे करा ३०.इंग्रजीत झाड ३१.क्रौच,एक पक्षी ३३.फणसाची एक जात ३६.पुरे,बेस्टचे एक वाहन ३७.दणकट,राकट ३९.एक मोठा व सुस्त साप ४०.चाट,थाप ४२.ज्याला वारीस नाही असा हिंदीत ४४.पाठवणी,बिदागी ४५.हिंदीत कालचा ४६.अफुचे बी ४८.संत,महंत ४९.मगर ५१.कमीत कमी ५३.एक ताणला जाणारा पदार्थ ५४.काजळ,अंजन हिंदीत ५५.मातीसारखी चव असेलेले ५७.ताजा,तवाना ६०.धारण करणारा ६१.मध ६३.विश्व ६४.संक्रांतीला स्त्रीया हे लुटतात ६५.लहान मुलींचा फ्रॉक ग्रामिण ६७.पावा,बासरी ७०.कढविलेला ऊसाचा रस ७२.मोहन उलटे करा ७३.आरंभ,श्रीगणेशा ७५.हरवणे,गडप ७६.घोडयाला काबुत ठेवण्यासाठी आवश्यक ७७.रानातला मेवा ७८.अजय देवगण,करीश्मा कपुर,जीवन,परेश रावल यांचा एक चित्रपट

उभे शब्द १.सडक,आँखे आदी चित्रपटात खलनायक तथा हास्यकलाकाराचे काम करणारा एक नट २.अमिताभ बच्चन,किमी काटकर यांचा 'जुम्मा चुम्मा'या गीताचा चित्रपट ३.बरकत,भरभराटीचा काळ ४.त्रास,यातना ५.शेवट,अंत ६.मुलगा हिंदीत ७.हात,हस्त ८.आठवडयातील सुटीचा वार १०.शासन,शिक्षा ११.बहुजन समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप १३.धडा,पाठ,मामला १४.कारल्याची चव,कडवट १५.वस्तु,पर्वत १६.संमती कळवणे,मान्य १७.इंग्रजीत तरूणासारखा १८.त्रासलेला २०.स्वयंपाक घरातील एक साधन २२.वीस उभेचे उत्तर २५.पाण्याचा संतत पडणारा बारीक प्रवाह २७.कामदेव,रतीपती २८.एक उंच उडणारा पक्षी ३१.सोन्याची परीक्षा,सत्व ३२.मोठा विळा ३३.चांगला,भला ३४.लोखंड साफ करण्याचे साधन ३५.प्रायव्हेट मराठीत ३६.सुबत्ता,भरभराट ३७.धाण्याचा तुरा ३८.समाप्त हिंदीत ३९.सतत,अखंड ४०.महाभारतातील एक राक्षस ४१.जमीन साफ करण्याचे एक शेतकी साधन ४३.खाली,रिक्त ४७.एक मराठी आडनाव ४८.सोबत रांगेत बसुन जेवणे ५०.मनाची तृप्ती ५१.किडा,कृमी ५२.रोख,पैसे देऊन ५४.मुलगा,धागा ५५.वानर,कपी ५६.इंदिराजींच्या आईचे नाव ५८.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक क्रिया ५९.गाण्याचा सराव ६२.रंजन करणारे ६३.जामीन घेणे,हमी ६४.गाईचे बाळ ६६.गाजावाजा,बोभाटा ६७.ज्याचे मोल करता येत नाही असे ६८.हिंदीत दास,अमीर खान,राणी मुखर्जी यांचा 'आती क्या खंडाला' गाण्याचा चित्रपट ६९.पडणे,ऱ्हास ७०.चिंता,फिकीर ७१.इंग्रजीत विजेता ७३.मुलाची बायको ७४.पवन,वात

# पडत्या पावसात मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केली धोकादायक शाळेची पाहणी



सोलापूर/प्रतिनिधीः सलग दोन दिवस पडत्या पावसात जिल्हा परिषदेच्या धोकादायक इमारत असलेल्या शाळेची पाहणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केली. सोलापूर महानगर पालिकेच्या हद्दीत असलेल्या मार्केडेंय नगर येथील जिल्हा परिषद इमारतींची पाहणी मंगळवारी तर बुधवारी मजरेवाडी व कुमठे येथील प्राथमिक शाळांची पाहणी जिल्हा परिषेदेच्या प्रशासक व सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केली. कामात हालगर्जी पणा केले बद्दल प्रभारी मुख्याध्यापकास कारणे दाखवा नोटीस देणेत आली आहे.यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी संजय जावीर, प्रभारी शिक्षणाधिकारी मल्लिनाथ निंबर्गी उपस्थित होते.

सोलापूर जिल्ह्यातील १०० शाळा धोकादायक असल्याचे निदर्शनास आलेनंतर प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी मार्केडेंय नगर चे इमारतीची पाहणी मंगळवारी केली. शाळेची झालेली दुरावस्थेबद्दल त्यांनी तात्काळ मुलांची सुरक्षितता घेणे बाबत मुख्याध्यापक व विस्तार अधिकारी यांना सुचना दिल्या. मुलांचा व शिक्षकांचा हजेरी रजिस्टर तपासून मुलांशी संवाद साधला. अंधुक उजेड असलेले शाळेच्या खोलीत सुर्यप्रकाशाच्या उजेडात त्यांनी पाहणी करून शिक्षकांकडून शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या. शाळेच्या एकुण चार खोल्या असून दोन खोल्या धोकादायक आहेत. या शाळेचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेत आले आहेत. यामध्ये ६० टक्के धोकादायक खोली असल्याचा अहवाल देणेत आला असल्याचे प्रभारी मुख्याध्यापक विठ्ठल यादव यांनी सांगितले.

शाळेच्या दुरावस्थेबद्दल सिईओ आव्हाळे यांनी चिंता व्यक्त केली. संवेदनशील असलेल्या सिईओ आव्हाळे यांनी पावसाची तमा न बाळगता महापालिकेच्या हद्दीत असलेल्या शाळांची पाहणी करून सुरक्षितेतच्या सुचना दिल्या.

**मजरेवाडी व कुमठे शाळांची पाहणी** कुमठे येथीस धोकादायक इमारतीची पाहणी सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केली. दरम्यान पाहणीस अती धोकादायक असलेल्या सहा शाळा खोलीतील मुलांना दुसरी कडे बसणेचे सुचना दिल्या. मजरेवाडी येथील अंगणवाडी ची खोली धोकादायक असलेने अंगणवाडी साठी सुरक्षित ठिकाणी बसविण्याच्या सुचना दिल्या. कुमठे येथे स्वत आहाराची तपासणी केली.

### सिईओ यांनी घेतला खिचडी चा आस्वाद..!

मजरेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत मुलांना शालेय पोषण आहार अंतर्गत देणेत येणारे आहाराची पाहणी केली. धान्याची स्वच्छता, सुरक्षितता, दर्जा व गुणवत्तेची पाहणी करून खिचडी स्वत खाऊन पाहिली. तांदळा पासून बनविलेल्या खिचडी मध्ये तुरदाळ, कांदा, व भोपळ्यांचा समावेश करणेत आला होता. मसाले टाकून ही खिचडी बनविणेत आली होती. आहारात आणखी सुधारणा करणेचे सुचना दिल्या.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी गटविकास अधिकारी यांनी सक्त सुचना

मार्केडेय नगर येथीस धोकादायक असलेल्या शाळेच्या इमारतीची पाहणी केलेनंतर जिल्ह्यातील सर्व धोकादायक इमारतीची सद्यस्थिती पाठविण्याच्या सुचना सिईओ मनिषा आव्हाळे यांनी तात्काळ गटविकास अधिकारी यांना दिले आहेत. धोकादायक इमारतीच्या ठिकाणी मुले बसणार नाहीत याची काळजी घेणेचे सुचना दिले आहेत.

**मजरेवाडीच्या प्रगती पाहून सिईओ समाधानी** मजरेवाडी येथील प्राथमिक शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून संवाद साधला. शाळेची इमारत व शाळेचे सौंदर्यीकरण व परिसर स्वच्छता व विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून सिईओ मनिषा आव्हाळे यांनी समाधान व्यक्त केले.

# चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त खर्डी येथे रक्तदान शिबिर संपन्न



### ५३रक्तदात्यांनी केले रक्तदान तसेच आरोग्य तपासणी व नेत्रदान तपासणीचे शिबिर आयोजन

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांचा येथे १ऑगस्ट रोजी वाढदिवस असल्याने पंढरपूर तालुक्यात तसेच पंचक्रोशीत विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले असता आज दिनांक २७जुलै रोजी खर्डी येथे रक्तदान शिबिर तसेच आरोग्य तपासणी शिबिर व नेत्रदान तपासणी शिबिराचा लाभ नागरिकांनी घेतला. ज्यांनी सोलापूर जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राला एक नवी दिशा दिली असे पंढरपूरचे सुपुत्र अभिजीत पाटील यांचा १ऑगस्ट रोजी वाढदिवस असल्याने त्यांच्या सहकाऱ्यांकडून तसेच कार्यकर्त्यांकडून वाढदिवसानिमित्त ठिकठिकाणी उपक्रमाचे आयोजन होत आहे. याप्रसंगी बोहाळी गावचे ज्येष्ठ उत्तम दादा जाधव यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले... यावेळी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता बागल मॅडम, नेत्र तपासणी तज्ञ डॉ.खांडेकर, पंढरपूर ब्लड बँकेचे शिवाजी कांबळे, श्रीमती कोंडे, खर्डी गावाचे अशोक महादेव पाटील, रामदास शामराव रोंगे, बापूसाहेब चिंतामणी रोंगे, ड.संजय रोंगे, वामन जाधव, भगवान भोसले, शंकर जाधव, लक्ष्मण डोंगरे, दिनकर रोंगे, विशाल रोंगे, पोपट पाटील, दत्तात्रय रोंगे, मनोहर जाधव, देविदास खुळे, तात्या पळसे, दत्तात्रय रणदिवे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# स्वेरीच्या दोन विद्यार्थ्यांची 'महिंद्रा अँड महिंद्रा' या कंपनीत निवड

पंढरपूर/प्रतिनिधीः 'महिंद्रा अँड महिंद्रा' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील दोन विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.ऑटोमोटिव्ह क्षेत्राशी संबंधीत असलेल्या 'महिंद्रा अँड महिंद्रा' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून इंजिनिअरिंगच्या महेश सुनील देशमुख व ऋतुजा विनायक कापसे या दोन विद्यार्थ्यांची निवड केली. महिंद्रा अँड महिंद्रा ही १९४५ साली स्थापन झालेली कंपनी आहे. ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील अग्रेसर व नामांकित कंपनी म्हणून या कंपनीची ओळख आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल,




एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी 'महिंद्रा अँड महिंद्रा' या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या महेश देशमुख व ऋतुजा कापसे यांचे अभिनंदन केले आहे.




# मालवाहतूक संघटनेचे स्वच्छतेसाठी मुख्याधिकारी यांना निवेदन

पंढरपूर/प्रतिनिधीः मालवाहतूक संघटना महाराष्ट्र राज्य पंढरपूर शाखेच्या वतीने मुख्याधिकारी पंढरपूर नगरपरिषद यांना निवेदन देण्यात आले. पंढरपूर नगरपालिके समोरील शिर्के अड्डा ते कोरे बिल्डिंग समोर घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे,

सदर भागात स्वच्छता करून मुरूम टाकून देण्यात देण्यात यावे अशी मागणी उपमुख्य अधिकारी सुनील वाळूजकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली यावेळी याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष दिलीप तात्या फडतरे, शहराध्यक्ष कृष्णा कवडे ,मार्गदर्शक दिलावर बागवान, पंजाब चंदनशिवे, सोमनाथ पवार, रमेश ओव्हाळ ,सुरज विभुते, समाधान घोडके, बळी हजारे ,राम शिकलकर, श्रीकांत देवकर ,समीर शेख ,महबूब बागवान, दीपक शेळके, रमेश शहापूरकर, अजित पालसांडे तसेच संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ.निखत इक्बाल तांबोळी हिने एमबीबीएस व नेत्ररोग तज्ञ परिक्षेत यश

अक्कलकोट : अक्कलकोट नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष कै.मं.शफी टिनवाला यांची नात डॉ.निखत इक्बाल तांबोळी हिने एमबीबीएस व एमएस ऑप्थोमोलॉजी (नेत्ररोग तज्ञ) परिक्षेत घवघवीत यश मिळविल्याबद्दल अक्कलकोटसह सोलापूर जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



डॉ.निखत तांबोळी हिने शालेय शिक्षण हरिभाई देवकरण प्रशाला सोलापूर, महाविद्यालयीन शिक्षण वालचंद महाविद्यालय सोलापूर, एमबीबीएस अश्विनी ग्रामीण कुंभारी, तर वैद्यकीय क्षेत्रात उच्च शिक्षण महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स नाशिक येथे झाली आहे. महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्स नाशिक येथे झालेल्या एम.एस. ऑप्थालॉजी परिक्षेत घवघवीत यश मिळविल्याबद्दल माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे, महाराष्ट्राचे माजी गृहराज्य मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, काँग्रेस शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक रईस टिनवाला, आई वाहेदा तांबोळी, आजी सलीमा टिनवाला, शाहेदा हुंडेकरी, खालेदा बागलकोटे, कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र घटकचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी डॉ.निखत तांबोळी हिचे अभिनंदन केले आहे.

# तोतया एसीबीच्या टीमचा छापा, निवृत्त अधिकाऱ्याच्या घरी सिनेस्टाइल थरार, दागिन्यांसह लाखो लुटले, काय घडलं?

**नवी मुंबईत एका तोतया अधिकाऱ्यांच्या टोळीनं फिल्मी स्टाइलनं लाखो रुपये लुटले आहेत. निवृत्त अधिकाऱ्याला लाखो रुपयांचा फटका बसला आहे.**

नवी मुंबई : शहरामध्ये दिवसेंदिवस चोरीच्या घटना घडत आहेत. त्यात अनेक वेळा एखाद्या उच्च पदावरील व्यक्तीची नावे सांगून किंवा आपणच ती व्यक्ती असल्याचे सांगून अनेकांची फसवणूक केली जाते. अशीच एक घटना ऐरोली मध्ये राहणाऱ्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्यांसोबत घडली आहे. सिनेमे पाहतो त्यात ज्या घटना घडतात अगदी अशाच प्रकारची लूटमार या घटनेत केल्याचे समोर आले आहे. एका सहा जणांच्या टोळीने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे म्हणजेच एसीबीचे अधिकारी असल्याचं भासवून लुटमार केल्याचे समोर आले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या घराची झडती घेण्याच्या निमित्तानं त्याच्याच घरातील रोख रक्कम दागिने आणि अजूनही काही वस्तू लुटल्याचे समोर आले आहे. ३४ लाख ८५ हजार रुपये किमतीचा ऐवज लुटला असल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेबाबत रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहा जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून रबाळे पोलीस अधिक तपास करत आहेत

नवी मुंबई शहरामध्ये राहणाऱ्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याच्या घरात सहा जणांनी तोतया लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी असल्याची बतावणी करुन दीड तासात ३४ लाख ८५ हजार रुपये लुटण्याची घटना घडली. ही घटना नवी मुंबईतील ऐरोली येथे घडली आहे. ही घटना २१ जुलैला घडली असली तरी सोमवारी याबाबतची तक्रार पिडीत सेवानिवृत्त अधिकाऱ्याने पोलिसांना दिली. याबाबत नवी मुंबईचे पोलीस तपास करीत आहेत.

नवी मुंबईतील ऐरोली नोडमधील सेक्टर ६ येथील साईराज इमारतीमध्ये कांतिलाल यादव यांच्या घरात ही घटना २१ जुलैला दुपारी साडेतीन ते पाच वाजता घडली. सहा जणांनी घरात येऊन लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस असून घरझडती घ्यायची असल्याचे सांगून त्र्सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा ३४ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन तेथून पसार झाले. ऐरोली मध्ये घडलेल्या ह्या घटनेने आजूबाजूच्या परिसरातील नागरिक सावध झाले आहेत. कारण अनेक सराईत चोरटे हे अशा प्रकारची बतावणी करून लूटमार करत असतात अशा प्रकारच्या अनेक घटना या अगोदरही नवी मुंबई मध्ये घडलेल्या आहेत. नवी मुंबई मधील ऐरोली मध्ये घडलेल्या ह्या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# दोन वर्षांनंतर तेजश्री प्रधानचं छोट्या पडद्यावर दमदार कमबॅक

## स्टार प्रवाहच्या नव्या मालिकेत दिसणार लक्षवेधी भूमिकेत



महाराष्ट्राच्या घराघरात आणि मनामनात पोहोचलेली सुप्रसिद्ध अभिनेत्री तेजश्री प्रधान टेलिव्हिजनवर दमदार कमबॅक करण्यासाठी सज्ज झाली आहे. स्टार प्रवाहच्या नव्या मालिकेतून एका नव्या अंदाजात तेजश्री प्रेक्षकांच्या भेटीला येईल. या मालिकेत तिची नेमकी कोणती भूमिका असणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र हे नवं पात्र साकारण्यासाठी तेजश्री प्रचंड उत्सुक आहे.

या नव्या पात्राविषयी सांगताना तेजश्री म्हणाली, 'मी ठरवून एक प्रोजेक्ट संपल्यानंतर काही काळ दिसणं टाळते. देवकृपेने प्रेक्षक माझ्या नव्या प्रोजेक्टची आतुरतेने वाट पहात असतात. जसं घरातली एखादी व्यक्ती कामानिमित्ताने बाहेर गेली की घरातले तिच्या वाटेकडे डोळे लावून बसेलेले असतात. अगदी तसाच अनुभव एक कलाकार म्हणून मीही घेतलाय. गेले कित्येक दिवस पुन्हा कधी भेटीला येणार याविषयी विचारणा होत होती. स्टार प्रवाहवर लवकरच एका नव्या मालिकेतून मी भेटीला येणार आहे हे सांगताना अतिशय आनंद होतोय. मला सकारात्मक भूमिका साकारायला आवडतं. माझी नवी भूमिका देखिल सकारात्मकच असेल. टेलिव्हिजन हे माझं आवडतं माध्यम आहे. खरतर कोरोना नंतर बऱ्याच गोष्टी बदलल्या आहेत. सोशल मीडियाचं महत्त्वही दिवसेंदिवस वाढत आहे. मी या सर्वच गोष्टी पुन्हा एकदा नव्याने अनुभवतेय. प्रामाणिकपणे काम करण्याचा नेहमीच प्रयत्न करत आले आहे आणि यापुढे देखिल करत राहिन. प्रेक्षकांचं प्रेम असंच मिळत राहो हीच अपेक्षा. जवळपास १२ वर्षांपूर्वी मी स्टार प्रवाहची तुझं नि माझं घर श्रीमंताचं ही मालिका केली होती. काही दिवसांपूर्वी फुलाला सुगंध मातीचा मालिकेतही पाहुण्या कलाकाराची भूमिका साकारली होती. नव्या मालिकेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या नंबर वन वाहिनीसोबत पुन्हा एकदा जोडली जातेय याचा आनंद आहे.

# अक्कलकोट येथील संगीत विद्यालयाचे केंद्र संचालकपदी मयूर स्वामी यांची निवड

अक्कलकोट/प्रतिनिधी : अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई सलग्नित श्री स्वामी समर्थ संगीत विद्यालय, अक्कलकोट या संगीत विद्यालाचे केंद्र संचालक पदि मयूर स्वामी यांची निवड करण्यात आली. सदर निवड अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या मार्फत करण्यात आली आहे.श्री स्वामी समर्थ संगीत विद्यालय, अक्कलकोट हि अक्कलकोट येथील सर्वात जुनी व एकमेव संगीत केंद्र आहे. या विद्यालयातून अनेक विध्यार्थी संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले आहेत. शास्त्रीय संगीताचे थोर उपासक संगीतालंकार कै.शरणप्पा कलबुर्गी हे या विद्यालयाचे संस्थापक व केंद्र संचालक म्हणून काम पाहत होते.



त्यांच्या पश्चात हे पद मयूर स्वामी यांच्या कढे सोपवण्यात आली आहे. या बद्दल शंकर लंगोटे, श्रीमती कुंदा नखाते, प्रभूलिंग कलबुर्गी, अशोक कडगंची, मल्लिनाथ स्वामी, वीरंणा कलबुर्गी, मनीषा करंदीकर, संतोष वगाले, चंद्रकांत डांगे, नागनाथ चव्हाण, अक्षय सरदेशमुख, ओंकार पाठक, आदित्य जोशी आणि महेश स्वामी आदींनी अभिनंदन केले.

# राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत अंजुमन इस्लाम संस्थेचा १५० वा वर्धापन सोहळा संपन्न

मुंबई : सन १८७४ मध्ये स्थापन झालेल्या मुंबईतील अंजुमन- ई - इस्लाम शैक्षणिक संस्थेच्या स्थापनेच्या १५० व्या वर्षाचा उद्घाटन सोहळा राज्यपाल रमेश बैस यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी अंजुमन समुहातील विविध संस्थांमध्ये अध्यापन करीत असताना पी.एचडी. प्राप्त करणाऱ्या ५७ अध्यापकांचा तसेच विद्यार्थ्यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




अंजुमन संस्थेच्या मुंबई सेन्ट्रल येथील सैफ तय्यबजी मुलींच्या शाळेच्या सभागृहात झालेल्या सत्कार सोहळयाला 'अंजुमन'चे अध्यक्ष डॉ झहीर काझी, वरिष्ठ उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. रवींद्र कुलकर्णी तसेच संस्थेचे विश्वस्त प्राचार्य, शिक्षक व माजी विद्यार्थी उपस्थित होते.